महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे–४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

स्वति श्रीराज्याभिषेक शके ३५०

| DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 / 25536712(OFF) | FAX- 020/25536761 E-MAIL - sscboardpune@gmail.com Website- www.sscboardpune.in |
|---|---|---|

क्रमांक पुविमं/डीपी/विषय मान्यता/ 942
पुणे-४११ ००५.
दिनांक- 11/02/2025

प्रति,
प्राचार्य,
कै. श्री. एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मिडीयम
स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज, टाकळीभान
ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर.
जे. १२.१४.०३४

**विषय:-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विषय मान्यतेबाबत.
**संदर्भ:-** १. आपला जा. क्र. समक्ष/ दि. २५/११/२०२४ चा प्रस्ताव.
२. शिक्षण उपसंचालक यांचे जा.क्र.शिउसं/उमाशि-४०५/अविमा/पुवि/२०२४-२५/१२४८८ दि. १८/११/२०२४ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपण या कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावानुसार इ.१२ वी साठी अतिरिक्त विषय मान्यतेबाबत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून उपरोक्त नमूद पत्रानुसार खालील तपशीलानुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मान्यता देण्यात येत असून, त्यानुसार विद्यार्थी प्रविष्ठ करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | इयत्ता | विषय | तुकडी | विषय कोड व शाखा |
|---|---|---|---|---|
| १ | इ.१२ वी | माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) | पहिली | ९७ विज्ञान |

**अटी व शर्ती -**

१) विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) हा विषय द्वितीय भाषेऐवजी किंवा चार वैकल्पिक विषयांपैकी एक विषय म्हणून कला/वाणिज्य/ विज्ञान शाखेसाठीच उपलब्ध आहे. द्विलक्षी व किमान कौशल्यावर आधारित विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना हा विषय घेता येणार नाही.

२) संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात किमान २० अद्ययावत संगणक असलेली अद्ययावत प्रयोगशाळा असणे आवश्यक आहे. इंटरनेट, कलर प्रिंटर्स, कॉम्प्युटर फर्निचर, टेलिफोन सुविधा, प्रोजेक्टर, सीडी ड्राइव्हज इत्यादी साहित्य उपलब्ध असावे.

३) संबंधित विषय शिकविण्यासाठी M.C.A, M.C.S.,M.Sc. (Computer), M.C.M., M.Sc., M.A., M.Com.+ADCSSAA,B.Ed शैक्षणिक अर्हता असणारे अनुभवी शिक्षक असणे आवश्यक आहे. उपरोक्त पात्रतेचे उमेदवार न मिळाल्यास शिक्षण उपसंचालकांच्या मान्यतेने M.C.M. अध्यापक नेमता येतील.

४) प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी XII विज्ञान with Computer, XII, M.C.V.C. with C.T., X with ITI, Computer, Diploma Computer.

५) सदर विषयासाठी एका गटामध्ये कमाल प्रवेश क्षमता राज्यमंडळ विषय योजनेनुसार असेल.

६) माहिती तंत्रज्ञान (आय. टी.) या अतिरिक्त विषयास विभागीय मंडळ पुणे यांच्याकडून मान्यता देण्यात आली असली तरीही प्रत्यक्ष सुविधा समाधानकारक पुरविण्याची व परीक्षेमध्ये कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याबाबतची जबाबदारी मान्यता घेणाऱ्या संस्था व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहील.

७) इयत्ता १२ वी च्या परीक्षेसाठी राज्य मंडळाने वेळोवेळी निर्धारित केल्यानुसार परीक्षा शुल्क देय राहील.

८) सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर विभागीय मंडळाने नियुक्त केलेल्या संबंधित आय. टी. समन्वयक शिक्षकांकडून प्रत्यक्ष संगणक कक्षाची (आय. टी. लॅबची) तपासणी नव्याने मान्यता दिलेली असल्यामुळे करून घेणे बंधनकारक राहील. आय. टी. समन्वयक यांच्या तपासणीबाबत आपणांस स्वतंत्रपणे मंडळामार्फत कळविण्यात येईल.

९) सदर अतिरिक्त विषयासाठीच्या मान्यतेबाबत आपण सादर केलेल्या प्रस्तावातील माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास तसेच शासन/राज्यमंडळाने दिलेल्या सुचनांची काटेकोर अंमलबजावणी न केल्यास सदर विषयाची मान्यता रद्द केली जाईल.

१०) माहिती तंत्रज्ञान (आय. टी.) विषय मान्यतेची शिफारस विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेली असल्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयाकडे शासन स्तरावरील सर्व आवश्यक मान्यता, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्या कार्यालयाकडील शाळा मान्यतेचे, तुकडी मान्यतेचे आदेश, शाखा मान्यता, विहीत विद्यार्थी क्षमता इ. या व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने तपासून शिफारस देणे ही बाब विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे कार्यालयाच्या अंतर्गत येते. त्यामुळे या कार्यालयाकडून शिफारस प्राप्त झाल्यामुळे या बाबींच्या अनुषंगाने कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास विषय मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव पाठविण्याची जबाबदारी विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांची राहील.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.

**प्रत माहितीस्तव** - शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे